| | |
|---|---|
| MHPU060019312012 | दाखल तारीख- ०६/१२/२०१२<br>नोंदणी तारीख- ०६/१२/२०१२<br>निर्णय तारीख- १५/०६/२०२६<br>कालावधी- १३ ०६ ०९<br>वर्षे महिने दिवस |

# <u>सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लष्कर न्यायालय, पुणे</u>

(पिठासन अधिकारी- भरत सं. जगदाळे यांचे समक्ष)

**<u>नियमीत फौजदारी खटला क्र. ७६७/२०१२</u>** **<u>निशाणी क्र. ५६</u>**

प्रथम खबरी अहवाल तपशील

अपराध क्रमांक : १३७/२०१२, दिनांक ०९/१०/२०१२

पोलीस स्टेशन : लष्कर, पुणे.

| | |
|---|---|
| तक्रारकर्ता | **महाराष्ट्र शासन तर्फे** पोलीस स्टेशन अधिकारी पोलीस स्टेशन,लष्कर, पुणे.<br>**मुळ तक्रारकर्ता** : **फईम अहमद अब्दुलरहीम अन्सारी**<br>वय- ४० वर्ष, धंदा - नोकरी,<br>तात्पुरता पत्ता-. ६४००, इंडिपेन्डेण्स पार्कवे, अपार्टमेंट नं. ४१०५, प्लॅनो टेक्सस ७५०२३.<br>कायमस्वरुपी पत्ता- मंगळवार वार, अंजुमन चौकाजवळ, मालेगाव, नाशिक. |
| महाराष्ट्र शासन/फिर्यादी तर्फे सादरकर्ता | ॲड. श्रीमती के.आर.कांबळे,<br>सहायक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **१. फरीद परवेज सय्यद,**<br>वय- २३ वर्षे, धंदा- शिक्षण,<br>पत्ता- गल्ली नं. ६ मिठानगर, कोंढवा, पुणे . |

| | |
|---|---|
| | **२. गौस शब्बीर शेख,**<br>वय– ४० वर्षे, धंदा– फिटर<br>पत्ता– २३९०, न्यु मोदीखाना, कॅम्प, पुणे.<br>**३. सलीम माजीद शेख,**<br>वय– ४२ वर्षे, धंदा– नोकरी,<br>पत्ता– गल्ली नं. ७, मिठानगर, कोंढवा, पुणे.<br>**४. अहमद कारवान सोहेल,(फरार)**<br>वय– २२ वर्षे, धंदा– शिक्षण,<br>पत्ता– मलबार माणिकचंद लुल्लानगर, पुणे. |
| आरोपी क्र. १ तर्फे<br>आरोपी क्र. २ व ३ तर्फे | ॲड. श्री. एम.अझरुद्दीन,<br>ॲड. श्री. एस.आर.घाटगे. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि. ०९.१०.२०१२ |
| गुन्हा नोंदणी तारीख | दि. ०९.१०.२०१२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | दि. ०६.१२.२०१२ |
| दोषारोप निश्चीत तारीख | दि. १७.११.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १६.०१.२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरीता ठेवल्याची तारीख | १५.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १५.०६.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, जर असेल तर | लागु नाही. |

## आरोपींचा तपशील

| | |
|---|---|
| आरोपींचे नाव | **१.फरीद परवेज सय्यद,**<br>**२. गौस शब्बीर शेख,**<br>**३. सलीम माजीद शेख,** |

| | **४. अहमद कारवान सोहेल (फरार)** |
|---|---|
| अटक तारीख | दि. ०९.१०.२०१२, दि. १३.१०.२०१२ व दि. २२.१०.२०१२ |
| जमानतवर सोडल्याची तारीख | दि. २२.१०.२०१२ |
| गुन्हा ठेवल्याचा तपशील | भा.दं.वि.चे कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह कलम ३४ व महाराष्ट्र विद्यापीठ, बोर्ड व इतर नमुद परीक्षामध्ये होणा–या गैरव्यवहारांना प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ७ व ८ अन्वये. |
| निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा केली | निर्दोष मुक्त केले |
| किती शिक्षा दिली | लागु नाही. |
| खटला चालु असतांना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील | लागु नाही. |

## सरकारपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | फईम अहमद अब्दुल रहिम अन्सारी (नि.क्र.५०) | फिर्यादी |
| २. | प्रियंका मोहन कांबळे (नि.क्र.५४) | साक्षीदार |

## बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## सरकारपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि. क्र. ५१ | फिर्याद वरील स्वाक्षरी |
| २ | नि. क्र. ५२ | छापील एफ.आय.आर. वरील  स्वाक्षरी |

## बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## मटेरीअल ऑब्जेक्ट / महत्वाच्या वस्तु

| अ.क्र. | मटेरीअल ऑब्जेक्ट / महत्वाच्या वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | विद्यापीठ हॉल तिकीट, आरोपी क्र. १ नामे– फरीद परवेझ सय्यद याचा वाहन चालविण्याचा परवाना, हिलाल खलील याचे मार्कशीट, अफजल याचे मार्कशीट व सर्टिफिकेट, मुजीब | –– |

| | | |
|---|---|---|
| | रहिमान याचे मार्कशीट व सर्टिफिकेट, अलमनधारी याचे मार्कशीट, पाशा अलीमुद्दीन याचे मार्कशीट, इब्राझिसोबा मलिका यांचे मार्कशीट, राजकुमार यांचे मार्कशीट, पाशा अलीमुद्दीन याचे मार्कशीट, शेख सलमान याचे मार्कशीट, हाश्मी यांचे हॉलतिकीट, साबळे यांचे मार्कशीट, अल्माशानी सय्यद यांचे मार्कशीट, मुजीब रहेमान यांचे मार्कशीट, दि मुस्लीम को. ऑपरेटीव्ह बँक लि. मध्ये पैसे जमा केल्याची दि. ०९.१२.२०११ रोजीची पावती, एक एम.एच. १२ एच व्ही २०२२ ही स्वीफ्ट कार, आरोपी क्र. २ नामे– गौस शब्बीर शेख याच्याकडून जप्त केलेली रु. १६,६७०/– रोख रक्कम, आरोपी क्र. २ नामे– गौस शब्बीर शेख याच्या कारच्या डिक्कीमधून जप्त केलेले ब्लॅक बेरी कंपनीचे एकूण १२ मोबाईल, सह्या असलेले एकूण ६ कागद, अल हजरी यांचे मार्कशीट, सनहमदी यांचे मार्कशीट, अल्लाहाजुरी यांचे मार्कशीट, शहा पुजा रमेश यांचे मार्कशीट, ए.ए.हफीज यांचे मार्कशीट, केंचे मनमान यांचे मार्कलिस्ट, ए.ए.हफीज यांचे मार्कशीट, के.एम.वसीम मोहम्मद यांचे मार्कशीट, सय्यद शेहरब यांचे मार्कशीट, खान आलिया मुस्ताक यांचे मार्कशिट, शेख अमरिन यांचे मार्कशीट, मोहम्मद अहमद यांचे मार्कशीट, पानीवाला हकीमुद्दीन यांचे मार्कशीट, सहार.एस.एस. यांचे | |

| | | |
|---|---|---|
| | मार्कशीट, सहार.एस.एस. यांचे सीट नं. ००५४२० बाबतचे मार्कशीट, ए.सादिक जब्बार यांचे मार्कशीट, जे.सुफिया यांचे मार्कशीट, जे.सुफिया यांचे सीट नं. ०३०१४ यांचे मार्कशीट, वर्णिकर यांचे मार्कशीट, शानुन नुरी यांचे मार्कशीट, एम.एच.अहमद यांचे मार्कशीट, अलमनधारी यांचे मार्कशीट, अलमेदी यांचे मार्कशीट, सय्यद खादीर यांचे मार्कशीट, शेख नादीया यांचे मार्कशीट, शेख मुजफ्फर यांचे मार्कशीट, अलजारी ओमर यांचे हॉलतिकीट, बी.एफ.फावन यांचे हॉलतिकीट, ॲरश यांचे हॉलतिकीट, व्ही.टी.राजकुमार यांचे हॉलतिकीट, आजीज अहमद यांचे हॉलतिकीट, शेख उगार शकील यांचे ॲडमीट कार्ड, एम.एच.अहमद यांचे मेंबर आयडी, आबेदा इनामदार यांचे ॲडमीट कार्ड, पास केलेल्या विद्यार्थीची एक यादी, सीट क्र. नमूद असलेली यादी, एक फायबरचा राउंड शिक्का, एक डायरी, विद्यार्थींचे शीट क्र. लिहिलेली यादी,आरोपी क्र. १ नामे– फरीद परवेझ सय्यद यांच्या ताब्यातून जप्त केलेले एक ब्लॅकबेरी कंपनीचा सीमसह मोबाईल व एक मायक्रोमॅक्स कंपनीचा सीमसह मोबाइल, आरोपी क्र. ४ याच्या ताब्यातून जप्त केलेली एक नोटबूक, आरोपी क्र. ४ याचे बी.कॉम. २०११–१२ या वर्षाचे ॲडमीशन फॉर्म व इतर दस्तऐवज व मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स, | |

| | | |
|---|---|---|
| | शिवाजीनगर, पुणे येथून जप्त केलेले परीक्षार्थींचे हजेरीपट, इत्यादी प्रस्तुत गुन्हयात जप्ती पंचनामे व मुद्देमाल पावती प्रमाणे नमूद असलेला मुद्देमाल. | |

## –न्या य नि र्ण य–

(पारीत दिनांक– १५/०६/२०२६)

१) प्रस्तुत खटला आरोपी क्र. १ ते ४ विरुध्द दाखल झालेला आहे. परंतु सदर खटल्यातील आरोपी क्र. ४ नामे– अहमद कारवान सोहेल हा फरार असल्यामुळे, सदर खटला आरोपी क्र. १ ते ३ करीता वेगळा करण्यात आला. त्यामुळे सदर खटला केवळ आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द भा.दं.वि.चे कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह कलम ३४ व महाराष्ट्र विद्यापीठ, बोर्ड व इतर नमुद परीक्षामध्ये होणा–या गैरव्यवहारांना प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ७ व ८ अन्वये चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे म्हणणे थोडक्यात खालील प्रमाणे नमुद करता येईल –**

२) सदर घटना दि. ०९.१०.२०१२ रोजी दुपारी ३.३० वाजेच्या वेळी पुना कॉलेज परीक्षा हॉल नं. १०१ मध्ये कॅम्प पुणे येथे घडली होती. त्यादिवशी आरोपी क्र. १ व २ यांनी इतर आरोपींशी संगनमत करुन, आरोपी क्र. ३ याच्याकडून( मुळ विद्यार्थी) ठराविक रक्कम घेवून, खोट्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे त्याच्या जागी आरोपी क्र. ४ यास परीक्षेस बसविले. याप्रमाणे सर्व आरोपींनी

संगनमताने खोटे व बनावट दस्तऐवज तयार करुन, फिर्यादी व संबंधित शैक्षणिक संस्थेची फसवणूक केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

३) सदर खटल्यातील आरोपपत्राचे अवलोकन केल्यानंतर, आरोपींविरुध्द दोषात्मक बाबी आढळुन आल्याकारणाने, आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द भा.दं.वि.चे कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह कलम ३४ व महाराष्ट्र विद्यापीठ, बोर्ड व इतर नमुद परीक्षामध्ये होणा–या गैरव्यवहारांना प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ७ व ८ अन्वये निशाणी क्रं. ४५ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. वरील सर्व आरोप सदर आरोपींना त्यांच्या मातृभाषेत समजावून सांगितले असता, आरोपींनी सर्व आरोप नाकारले व सदरचा खटला चालविण्यात यावा अशी विनंती केली.

४) सदरच्या खटल्यात अभियोग पक्षातर्फे फिर्यादी नामे– फईम अहमद अब्दुल रहिम अन्सारी यांचा तोंडी पुरावा निशाणी क्र. ५० अन्वये नोंदविला आहे. तसेच साक्षीदार क्र. २ नामे– प्रियंका मोहन कांबळे यांचा तोंडी पुरावा निशाणी क्र ५४ अन्वये नोंदविलेला आहे. तसेच उर्वरित साक्षीदारांना समन्स काढून देखील ते न्यायालयात हजर झालेले नाही. त्यामुळे सदर खटल्याचे जुने वय व उपरोक्त सर्व तथ्य परिस्थिती विचारात घेवून निशाणी क्र. १ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाचा पुढील पुरावा बंद केला. तसेच उपलब्ध पुराव्यात आरोपींविरुध्द दोषात्मक पुरावा उपलब्ध नसल्यामुळे, त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन वगळले.

५) अभियोग पक्षाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती के आर कांबळे व आरोपींचे विधिज्ञ श्री. एस.आर.घाटगे व श्री.ए.जे. सय्यद यांचा युक्तीवाद ऐकला. सदर खटल्यात नमूद असलेल्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, खालील मूद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमीमांसेसहित खालील प्रमाणे नमूद करीत आहे.

| अ.क्र. | **मूद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि. ०९.१०.२०१२ रोजी दुपारी ०३:३० वाजेच्या वेळी पूना कॉलेज, परीक्षा हॉल क्रं. १०१, कॅम्प, पुणे येथे आरोपी क्र. १ नामे– फरीद परवेझ सय्यद याने इतर आरोपींशी संगनमत करुन, त्याने तो आरोपी क्र. ४ नामे– अहमद कारवान सोहेल आहे, असे भासवून, त्याच्या जागी परीक्षा देवून, संबंधित शैक्षणिक संस्थेची फसवणूक केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४१९ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे काय? | **नकारार्थी** |
| २) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की,उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ याने इतर आरोपींशी संगनमत करुन, त्याने तो आरोपी क्र. ४ आहे, असे भासवून, त्याच्या जागी परीक्षा देवून, संबंधित शैक्षणिक संस्थेची फसवणूक केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४२० सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे काय? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने बनावट परीक्षा हॉल तिकीट क्र. ४५५९ हे तयार करुन, आरोपी क्र. १ याने आरोपी क्र. ४ च्या जागी परीक्षा देवून, संबंधित शैक्षणिक संस्थेची फसवणूक केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४६५ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे काय? | **नकारार्थी** |
| ४) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी संबंधित शैक्षणिक संस्थेची फसवणूक करण्याच्या उद्देशाने आरोपींनी संगनमताने बनावट परीक्षा हॉल तिकीट क्र. ४५५९ इत्यादी कागदपत्रे तयार केली व त्यांचा फसवणूक करण्याच्या उद्देशाने वापर केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४६८ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे काय? | **नकारार्थी** |
| ५) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने बनावट परीक्षा हॉल तिकीट क्र. ४५५९ हे खरे असल्याचे भासवून, आरोपी क्र. १ याने आरोपी क्र. ४ च्या जागी परीक्षा दिली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४७१ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे काय ? | **नकारार्थी** |
| ६) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ याने इतर आरोपींशी संगनमत करुन, त्याने तो आरोपी क्र. ४ आहे, असे भासवून, त्याच्या जागी परीक्षा देवून, संबंधित शैक्षणिक संस्थेची फसवणूक | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | केली व त्याद्वारे आरोपींनी महाराष्ट्र विद्यापीठ, मंडळ व इतर निर्दिष्ट परीक्षा गैरप्रकार प्रतिबंध अधिनियम, १९८२ चे कलम ७ सह कलम ८ प्रमाणे गुन्हा केला आहे काय? | |
| ७) | काय आदेश ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

:: **कारणमिमांसा** ::

**मूद्दा क्रमांक १ ते ६ करीता :–**

६) प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी नामे– फईम अहमद अब्दुल रहिम अन्सारी यांनी निशाणी क्र. ५० वरील पुराव्यात असे नमूद केले आहे की, कथित घटनेच्या दिवशी पोलिसांनी त्यांची एका मराठी मजकूराच्या पेपरवर सही घेतली होती. परंतु त्यांना सदर घटनेबाबत काहीही आठवत नाही. तसेच सदर साक्षीदाराने फिर्याद व छापील एफ आय आर वरील केवळ त्याच्या सह्या ओळखून, त्यातील मजकूर आठवत नसल्याचे नमूद केले. तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये देखील सदर साक्षीदाराने त्यांचे सर्व उत्तरसुचक प्रश्न नाकारलेले आहे.

७) तसेच आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या सदर साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता, सदर घटनेच्या वेळी पोलिसांनी सदर साक्षीदाराची निश्चित कोणत्या पेपरवर सही घेतली होती, हे त्याला सांगता येणार नाही, ही बाब सदर

साक्षीदाराने मान्य केली आहे. तसेच सदर पेपरमधील मजकूर पोलिसांनी सदर साक्षीदाराला वाचून दाखविला नव्हता, हे देखील त्याने मान्य केले आहे. तसेच सदर केस बाबत सदर साक्षीदाराला काहीही आठवत नसल्याचे त्याने मान्य करुन, सदर केस यापूढे त्याला चालवायची नसल्याचे देखील त्याने मान्य केले आहे. याप्रमाणे सदर साक्षीदाराचा तोंडी पुरावा अभिलेखावर उपलब्ध आहे.

८) तसेच अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. २ प्रियंका मोहन कांबळे यांनी निशाणी क्र. ५४ वरील तोंडी पुराव्यात असे नमूद केले आहे की, घटनेच्या दिवशी त्या पुना कॉलेज येथे परीक्षेकरिता गेल्या होत्या. परंतु त्यांना सदर घटनेबाबत काहीही आठवत नाही. तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये देखील सदर साक्षीदाराने त्यांचे सर्व उत्तरसुचक प्रश्न नाकारलेले आहे. तसेच आरोपीमार्फत घेण्यात आलेल्या सदर साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता, कथित घटनेच्या दिवशी सदर साक्षीदारासमक्ष परीक्षा हॉलमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडला नव्हता, हे सदर साक्षीदाराने मान्य केलेले आहे. याप्रमाणे सदर साक्षीदाराचा तोंडी पुरावा अभिलेखावर उपलब्ध आहे.

९) एकंदरित सदर दोन्ही साक्षीदारांच्या उपरोक्त तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांनी आरोपींविरुध्द काहीही दोषात्मक सांगितलेले नाही. त्यामुळे सदर दोन्ही साक्षीदारांच्या तोंडीपुराव्यातून फिर्याद मधील मजकूर सिध्द होत नाही. तसेच आरोपींविरुध्द इतर कुठलाही दोषात्मक पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे वरील कारणमिमांसेस अनुसरुन **मुद्दा क्र. १ ते ६ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.**

**मुद्दा क्रमांक ७ करीता** :–

१०) सदरील मुद्याच्या निष्कर्षासाठी मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करत आहे.

## // आ दे श //

१) आरोपी नामे– **१. फरीद परवेज सय्यद, २. गौस शब्बीर शेख, ३. सलीम माजीद शेख**, यांची फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.चे कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह कलम ३४ व महाराष्ट्र विद्यापीठ, बोर्ड व इतर नमुद परीक्षामध्ये होणा–या गैरव्यवहारांना प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ७ सह कलम ८ अन्वयेच्या या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) सदर आरोपींनी पूर्वी दाखल केलेले जातमुचलके व जामिनकदबे रद्द करण्यात येतात व त्यांच्या जामीनदारास जामीन बंध पत्रातून मुक्त करण्यात येते.

३) आरोपी क्र. १ ते ३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये पूर्तता केली.

४) **अ)** प्रस्तुत खटल्यातील मुद्देमाल पावत्यांमध्ये नमूद सर्व हॉल तिकीट, मार्कशीट, शिक्का व इतर सर्व कागदपत्रे अपिलाचा कालावधी संपल्यानंतर विद्यमान प्राचार्य पुना कॉलेज, कॅम्प पुणे यांच्याकडे पुढील विल्हेवाटीकरिता देण्यात यावे.

**ब)** तसेच दि. ०९.१०.२०१२ रोजीच्या जप्ती पंचनाम्यानुसार आरोपी क्र. २ नामे– गौस शब्बीर शेख याच्या कारच्या डिक्कीतून जप्त केलेले स्क्रॅप असलेले एकूण १२ मोबाईल व त्यांच्या बॅटरी अपीलाचा कालावधी संपल्यानंतर सदर आरोपीला परत करावे.

**क)** तसेच दि. ०९.१०.२०१२ रोजीच्या जप्ती पंचनाम्यानुसार आरोपी क्र. २ नामे– गौस शब्बीर शेख याच्याकडून जप्त केलेली ५०० व १०० रुपये दराच्या नोटा असलेली एकूण रक्कम १६,६७० रुपये रक्कम अपीलाचा कालावधी संपल्यानंतर सदर आरोपीला परत करावी.

**ड)** तसेच दि. ०९.१०.२०१२ रोजीच्या जप्ती पंचनाम्यानुसार आरोपी क्र. २ नामे– गौस शब्बीर शेख याची जप्त केलेली चारचाकी स्वीफ्ट कार क्र. एम.एच. १२ एच.व्ही. २०२२ हे चारचाकी वाहन सदर आरोपीला परत मिळालेले असल्याचे त्याने निशाणी क्र. ५५ वरील पुरशीस प्रमाणे नमूद केले. त्यामुळे अपिलाचा कालावधी संपल्यानंतर सदर वाहन हस्तांतरणाचा अंतरिम आदेश कायम होईल.

**इ)** तसेच दि. १८.१०.२०१२ रोजीच्या जप्ती पंचनाम्यानुसार आरोपी क्र. १ नामे– फरीद परवेझ सय्यद याच्याकडून जप्त केलेले ब्लॅकबेरी व मायक्रोमॅक्स कंपनीचे दोन मोबाईल हे सदर आरोपीला परत मिळालेले असल्याचे त्याने निशाणी क्र. ५५ वरील पुरशीस प्रमाणे नमूद केले. त्यामुळे अपिलाचा कालावधी

संपल्यानंतर सदर मोबाईल हस्तांतरणाचा अंतरिम आदेश कायम होईल.

५) आरोपींना क्र. १ ते ३ यांना लगेचचं मुक्त करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात श्रुतलेखीत व उद्घोषीत करण्यात येतो.)

Shri. Bharat Santaram Jagdale

Digitally signed by Shri. Bharat Santaram Jagdale
Date: 2026.06.15 17:42:48 +0530

ठिकाण :– पुणे

दिनांक :– १५/०६/२०२६

(भरत सं. जगदाळे)
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Jt. Judicial Magistrate First Class,<br>Cantonment Court, Pune. |
| Name of the Steno | : | S. N. Khairnar |
| Judgment Date | : | 15.06.2026 |
| Judg. signed by P.O. on | : | 15.06.2026 |
| Judgment uploaded on | : | 15.06.2026 |